संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
नवा काळ
रोखठोक बेधडक
संपादकीय.... ।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# सीबीआय म्हणजे सल्लामसलत केंद्र नव्हे

आपल्या सेवानिवृत्तीला केवळ १२ दिवस उरले असताना केंद्रीय अन्वेषण विभागाचे संचालक रणजित सिन्हा यांना उच्च न्यायालयाची थप्पड खाण्याची वेळ आली. टुजी स्पेक्ट्रम घोटाळ्यामधल्या आरोपींची भेट घेतल्याच्या आरोपावरून सिन्हा यांच्यावर कोर्टकचेरीचा सामना करावा लागला. न्यायालयाने सिन्हा यांना टुजी प्रकरणाच्या तपासापासून दूर राहण्याचे आदेश दिले आहेत. एवढ्या मोठ्या राष्ट्रीय पातळीवरच्या तपासयंत्रणेच्या प्रमुखावर अशाप्रकारची वेळ यावी हे काही चांगले लक्षण ठरत नाही. कारण न्यायालयाचा हा आदेश केवळ सिन्हा यांच्यापुरता मर्यादित राहत नाही. त्याचा संबंध केंद्रीय अन्वेषण विभाग म्हणजे सीबीआयच्या प्रतिष्ठेलाही धक्का पोहोचतो. देशातल्या सर्वांत मोठ्या तपास यंत्रणेच्या प्रमुखाभोवतीच संशयाचे वलय निर्माण होत असेल तर मग या संस्थेचे कामकाज किती पारदर्शक चालत असेल, याबद्दल प्रश्न निर्माण होतात. देशात जेवढे काही मोठे घोटाळे किंवा भ्रष्टाचाराची प्रकरणे बाहेर आली त्याचा तपास सीबीआयकडे सोपविला गेला. या घोटाळ्यामध्ये अनेक बडी धेंडे अडकली आहेत. त्यात मोठे राजकीय नेते, बडे भांडवलदार आणि उच्च पदस्थ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. हे सगळे लोक दबाव निर्माण करून आपली सुटका कशी होईल याच्या प्रयत्नात असतात. ज्या वेळी आपल्याभोवतीचा फास आवळला जाण्याची भीती वाटू लागते, त्या वेळेला ही मंडळी वाट्टेल तो मार्ग स्वीकारतात. खरे तर एकदा न्यायालयामध्ये आरोपी म्हणून खटला सुरू झाल्यानंतर अशा लोकांनी कोणत्याही तपासयंत्रणेच्या अधिकाऱ्यांची भेट घेणे गैर ठरते आणि या अधिकाऱ्यांनासुध्दा अशा मंडळीशी संपर्क ठेवणे बेकायदेशीर म्हटले पाहिजे. परंतु सिन्हा यांना त्याचे भान राहिले नाही आणि त्यांनी कोणतीही भिडभाड न ठेवता घोटाळ्यामध्ये अडकलेल्या आरोपींची मुक्तपणे भेट घेतली. त्यांच्या या बेजबाबदारपणालाच न्यायालयाने खडसावले आहे.

### सीबीआयच्या प्रतिष्ठेला धक्का

न्यायालयाचा हा निर्णय अशासाठी महत्त्वाचा ठरतो की, यापुढे सीबीआय किंवा कोणत्याही गुन्हा तपासयंत्रणेचा प्रमुख भ्रष्टाचार करणाऱ्याशी संपर्क ठेवणार नाही किंवा असे करणे बेकायदेशीर आहे, हेच न्यायालयाच्या आदेशाने स्पष्ट झाले आहे. एकतर सीबीआय ही संस्था आधीपासून तशी बदनाम यंत्रणा मानली जाते. सत्ताधारी पक्ष या यंत्रणेचा स्वत:च्या राजकीय सोयीसाठी अनेक वेळेला वापर करत असतो. आपल्या विरोधकांना प्रभावाखाली ठेवण्यासाठी सीबीआयचा वापर केला जातो. कोणाविरुध्द भ्रष्टाचार किंवा गैरव्यवहाराची तक्रार आली तर त्याची चौकशी करण्यासाठी ती प्रकरणे सीबीआयकडे सोपविली जातात आणि मग संबंधित विरोधी लोकं सरकारविरुध्द भूमिका घेऊ शकत नाहीत. कारण सीबीआयच्या तपासाची टांगती तलवार ठेवली जाते आणि म्हणूनच सीबीआयला सत्ताधारी मंडळी स्वार्थासाठी वापरून घेत असतात. अनेक वर्ष काँग्रेसकडून हा प्रकार होत राहिला आणि मग सीबीआय म्हणजे काँग्रेस ब्युरो ऑफ इनव्हेस्टिगेशन असे त्याचे वर्णन होऊ लागले. सत्ताधाऱ्यांच्या हातातले बाहुले म्हणजे सीबीआय, अशी या यंत्रणेची प्रतिमा तयार झाली. जी यंत्रणा सत्ताधाऱ्यांच्या राजकीय दबावापासून मुक्त राहिली पाहिजे, तिची स्वायत्तता टिकली पाहिजे. आपली प्रतिमा टिकण्याचे काम या संस्थेच्या प्रमुखानेही करणे तितकेच महत्त्वाचे असते. दुर्दैवाने आतापर्यंत सीबीआयच्या अनेक प्रमुखांनी सत्ताधाऱ्यांपुढे माना टाकल्या म्हणून सिन्हा यांच्यावर ही वेळ आली.

### आरोपींची भेट अनावश्यक

ही केवढी खेदजनक गोष्ट ठरते की, एवढ्या मोठ्या तपास संस्थेचा प्रमुख गैरव्यवहार करणाऱ्या आरोपींच्या भेटीगाठी घेतो आणि त्याचे त्याला काहीच वाटत नाही. आपण सीबीआयचे प्रमुख आहोत, याचा अर्थ आपण काहीही केले तरी चालते,त्याला कोणी आक्षेप घेण्याची हिम्मत करणार नाही, असा सिन्हा यांचा समज झाला असावा. घटनेच्या चौकटीमध्ये या तपासयंत्रणांना विशेष अधिकार दिले गेले आहेत. त्यांनी कोणत्याही राजकीय हस्तक्षेपाला बळी न पडता निर्भीडपणे चौकशी करावी अशी त्यांच्याकडून अपेक्षा असते. आरोपींशी सल्लामसलत करण्यासाठी केंद्राने योग्य पध्दतीने तपास पूर्ण करायचा आणि संबंधितावर न्यायालयात खटले दाखल करायचे, ही सीबीआयच्या कामाची पध्दत असली पाहिजे. आरोपींना जे काही सांगायचे असेल ते त्यांनी न्यायालयात वकिलामार्फत सांगावे. तिथे कदाचित सीबीआयच्या तपासाबद्दल आरोपीला तक्रार करता येऊ शकते किंवा तपासामध्ये आपल्यावर अन्याय झाला असेल तर त्याविरुध्द दाद मागण्याचीही सोय आहे. असे असताना सिन्हा यांनी टुजी प्रकरणातल्या आरोपींना भेटण्याची कोणतीच आवश्यकता नव्हती. या एका चुकीमुळे सिन्हा हेच विनाकारण चौकशीच्या फेऱ्यात अडकले आणि सीबीआयच्या कामाबाबतही संभ्रम निर्माण करून गेले. सरकारनेसुध्दा या निर्णयाची गंभीर दखल घेतली आहे. अशा प्रकारच्या मोठ्या संस्थांच्या प्रमुखांनी काय संकेत पाळले पाहिजेत. याबाबतची आचारसंहिताच त्यांना घालून दिली पाहिजे. कारण या प्रमुखांचा व्यक्तिगत व्यवहारही त्या पदाच्या प्रतिष्ठेशी निगडित असतो. म्हणून त्यांनी अधिक सावध असण्याची गरज आहे. आपल्यामुळे पद किंवा ती संस्था वादग्रस्त ठरणार नाही, याची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सत्ताधारी अशा संस्थांचा वापर करून घेतातच, पण आता जर आरोपीदेखील या संस्थांचा अशा पध्दतीने उपयोग करून घेणार असतील तर मग त्या संस्थेचे अस्तित्वच धोक्यात आले असे म्हणावे लागेल.